REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# शीखधर्मीय पंचप्यारांचे ऐतिहासिक योगदान

गिरे के.ए. आणि डॉ. तुकाराम नारायण शिंदे
एम.ए.सेट. पीएच.डी,
इतिहास विभाग प्रमुख, ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

## प्रस्तावना –



शीखधर्म हा जगातील प्रमुख धर्मापैकी एक मोठा धर्म आहे. श्री गुरु तेग बहाद्दुरजीनंतर श्री गुरु गोविंदसिंगजीहे शीख धर्माचे दहावे गुरु आहेत. श्री गुरु गोविंदसिंगजीचे कार्य जगभर प्रसिद्ध आहे. शीखधर्मात जेवढे महत्त्व धर्म संस्थापकांना आहे तेवढेच महत्त्व पंचप्यारांना आहे. शोषणविरहीत समाज रचना करण्यासाठी श्री गुरु गोविंदसिंगजीनीपंचप्यारे निर्माण केले. त्यांनी 1699 साली वैशाखी सणाच्या संमेलनासाठी बोलावले आणि एक कठिण परीक्षा घेतली.[1]

त्यावेळेस श्री गुरु गोविंदसिंगजीअसे म्हणाले की, धर्म आणि राष्ट्रांच्या रक्षणासाठी आपले शीर अर्पण कोण करेल?[2] असा प्रश्न केला तेव्हा भाई दयारामजी, भाई धरमदासजी, भाई हिम्मत रायसी, भाई साहिबचंदजी, भाई मोहकम चंदजी हे स्वतःहून तयार झाले.[3] त्या सर्वांना घेऊन श्री गुरु गोविंदसिंगजीएका शामियान्यात गेले व बाहेर एकटेच एक माखलेल्या तलवारीसोबत बाहेर आले. हे बाहेर उभा असलेले सर्व लोक पाहत होते व नंतर ते पाच लोक बाहेर आले. हे तेच पाच बहादूर लोक पुढे 'पंचप्यारे' म्हणून ओळखले जाऊ लागले.[4] नंतर ह्याच पंचप्यारे कडुन श्री गुरु गोविंदसिंगजींनीअमृत पान केले. ह्याच पंचप्यारांचे रुपांतर पुढे खालसा पंथ स्थापन केला. खालसा पंथातील सदस्यांनी पाच 'कं' कार राखण्याचा उद्देश केला. हे पाच 'कं' कार म्हजे केस, कंगवा, कच्छ, कडा, कृपाण. [5] श्री गुरू गोविंदसिंगजीयांनी नंतर उच्चारले

"वाहे गुरुजी का खालसा
वाहे गुरुजी की फतेह" [6]

श्री गुरु गोविंदसिंगजीह्या पंचप्यारांच्या नावासोबत सिंहशब्द जोडण्यास सांगितला. त्यांना नवीन गणवेश दिला. तसेच लोखंडाचे कडे देखील अर्पण करण्यास सांगितले. त्या दिवशी तब्बल वीस हजार लोकांना अमृतपान दिले. ह्यात कुढल्याच प्रकारचा भेदभाव जनमाणसात केला नाही. त्याकाळी मुघलांची सत्ता होती. हिंदुंनीफेटा बांधणे, शास्त्र धारण करणे व घोड्यावर स्वार होणे ह्यास मान्यता नव्हती. पण या सर्व बाबींना श्री गुरु गोविंदसिंगजीयांनी आवाहन देऊन पंचप्यारांना केस राखणे, फेटा बांधणे, शस्त्र धारण करणे, घोडेस्वारी करण्याची आज्ञा दिली.

**उद्देश -**

हा शोध निबंध खालील उद्देश समोर ठेवून तयार केला आहे.

1. शीख धर्मातील पंचप्यारेंच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
2. शीखधर्माच्या दृष्टीने पंचप्यारेंच्या महत्त्वपूर्ण स्थानाचे अध्ययन करणे.
3. शीखधर्मीय सामाजिक क्षेत्रातील पंचप्यारेंच्या कार्याची माहिती घेणे.
4. शीखधर्मातील पंचप्यारेंच्या धार्मिक कार्याचा आढावा घेणे.
5. शीखधर्मातील पंचप्यारेंच्या योगदानाची जाणीव आजच्या पिढीला करून देणे.

**शीखधर्मीय पंचप्यारेंच्या कार्याचे महत्व -**

**1) शीख धर्मातील ऐतिहासिक महत्त्वाची घटना -**

श्री गुरु गोविंदसिंगजीहे एक अध्यात्मिक गुरु, कवी, योद्धा व तत्वज्ञ होते.[7] त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन होता. त्याप्रमाणे त्यांनी करून दाखविले. धर्माच्या जनसामान्यांच्या रक्षणासाठी त्यांनी तलवार उगारली. पंचप्यारा आणि खालसा पंथ स्थापनेमध्ये श्री गुरु गोविंदसिंगजी यांना अग्रण्य स्थान आहे. त्यांच्यामुळे पंचप्यारा व खालसाची निर्मिती झाली. 1699 साली खालसाची निर्मिती ही शीखधर्मीय समाजासाठी इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अशी घटना मानली जाते त्यातुनच सत्याचे अनुकरण करणा-या व्यक्तिमत्वाचे निर्माण झाले.[8]

**2) पंचप्यारे शिरच्छेद करायला तयार -**

1699 रोजी वैशाखीच्या दिवशी आनंदपुरसाहीब या पवित्र भूमीवर हजारो लोक जमले होते. तो वैशाखीचा पवित्र असा सण होता. श्री गुरु गोविंदसिंगजीच्यानेतृत्वाखाली झालेल्या या मेळाव्यात त्यांच्या हातात उघडी तलवार चमकत होती. जे आपल्या बलिदानाने धर्माचे आणि दुःखाचे रक्षण करण्यास सक्षम आहेत. त्यांनी पुढे यावे अशा वेळेस शीर अर्पण करण्यास तयार होणारा पहिला व्यक्ती लाहोरचा दयाराम होता.[9] त्यानंतर पाच प्रियजन एक एक करून शीर अपर्ण करण्यासाठी उठले आणि त्यांच्यापासून खालसा पंथ स्थापन केला. हेच शीख धर्मातील पवित्र प्रथम पंचप्यारे म्हणून जगभर प्रसिद्ध झाले.

**3. पंचप्यारामुळे अनुयायांच्या सहभागात वाढ -**

पंचप्यारामुळे 80,000 अनुयायी सहभागी झाले.[10] त्यामुळे खालसा पंथ वाढीस होण्यास मदत झाली. इतिहासाचे प्राध्यापक हरविंदर चावला म्हणतात की पंचप्यारे यांनी खालसात दिक्षा घेतल्याने अनेक बदल झाले आहे. त्याला खंडा दी पाहुल म्हणजेच दुधारी तलवार देण्यात आली. यावेळी मूळ अमृत संस्कारादरम्यान दीक्षा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे वैशाखीच्या दिवशी श्री गुरु गोविंदसिंगजींनापाच प्रियजन सापडले होते व त्यातून खालसापंथ प्रबळ झाला.

**4. पंचप्यारामुळे नगर कीर्तनाला महत्व -**

ह्या पाच प्रियकरांनी शीख इतिहासाचा मूलभूत पाया रचला व शीख धर्मांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.[11] या अध्यात्मिक योद्धांनी रणांगणात शत्रूंशी झुंज देण्याची शपथ घेतलीच शिवाय त्यांनी नम्रता आणि सेवाभावही दाखवला. गुरुद्वाराच्या इमारतीची पायाभरणी करणे, कार सेवेचे उद्घाटन करणे, खंडादी पाहुल सुरू करणे, प्रमुख धार्मिक मिरवणुकांचे नेतृत्व करणे, शोभयात्रामध्ये पंचप्याराना विशेष प्रमुख स्थान दिले जाते. ह्या सर्व धार्मिक कार्यामुळे पंचप्यारांना अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे

### 5. पंचप्यारामुळे जीवन मार्गावर चालण्याची योग्य प्रेरणा -

शीख धर्मात गुरूपरंपरेचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. श्री गुरु नानक देव पासून ते श्री गुरुग्रंथ साहेब ह्या गुरूंना विशेष महत्त्व आहे. ह्या गुरूंनी सांगितलेला मार्गावर चालण्याची प्रेरणा ह्या समाजास मिळते. एक उत्तम मार्गदर्शनाची भूमिका आजच्या पिढीस पंचप्यारामुळे मिळते.

### सारांश -

भारतीय इतिहासात शीखधर्मीय चळवळीचे आंदोलन सर्वात मोठे आहे. स्वतंत्रपूर्वकाळात शांतीने कितीही जगावे वाटले तरी युद्ध हे एक पार्श्वभूमी नियतीने लिहिली गेली होती. श्री गुरु गोविंदसिंगजीहे शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून जगभरात प्रसिद्ध आहेत. शीख धर्मात जसे गुरूंना महत्त्व आहे तसेच महत्व पंचप्यारांना आहे.

ज्यावेळेस जनसामान्य विखुरलेला होता. परकीय आक्रमणांनी त्रासला होता अशा वेळेस जनसामान्यांच्या संरक्षणासाठी श्रीगुरुगोविंदसिंगांनीवैशाखी सणा निमित्त सभा बोलवली व ते म्हणाले की, धर्माच्या व राष्ट्राच्या रक्षणासाठी आपले मुंडके कापून देण्यास कोण तयार आहे ? असे म्हटल्यावर पाच लोक आपले डोके अपर्ण करण्यास तयार झाले व त्या पाच प्रियजनानांच पुढे खालशाचे रुप देण्यात आले. या पंचप्यारांना दुधारी तलवार, केस वाढवणे, पगडी बांधणे, गणवेश असे स्वतंत्र्य मिळाले होते. ह्या पंचप्यारामुळे शीख धर्माच्या पाया भक्कम होण्यास भरपुर मदत झाली. ह्या पंचप्यारांचा अमृतपान सोहळा पार पडल्यानंतर इतर लोकांनी त्यांचे अनुकरण करून 80,000 अनुयायी खालसा पंथात सहभाग नोंदविला. आज पंचप्यारांचे महत्त्व अबाधीत आहे. प्रत्येक सण, समारंभ ह्या कार्यात अग्रभागी स्थान पंचप्यारांना असते. ह्या पंचप्यारांमुळे शीखधर्मीय इतिहासात मोलाची भर पडली आहे. मोगलांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी व जनसामान्यांचे संरक्षण होण्यासाठी पंचप्यारांचे कार्य खूप महत्त्वपूर्ण आहे. [12]

भारतीय इतिहासात शीख धर्मीय पंचप्यारांना अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच आज जगभरात शीखधर्म एक प्रमुख धर्म म्हणून ओळखला जातो. [13]

### निष्कर्ष -

1) शीखधर्मात पंचप्यारांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे.

2) शीखधर्मात पंचप्यारांचे स्थान अत्यंत श्रद्धेय व महत्त्वपूर्ण आहे.

3) शीखधर्मीय पंचप्यारे विविध प्रकारची समाजोपयोगी कामे करण्यात अग्रभागी असतात.

4) शीखधर्मीय पंचप्यारे धार्मिक सण व समारंभ अत्यंत उत्साहाने पार पडतात.

5) शीखधर्मीय पंचप्यारांचे दिलेले योगदान आजही खूप प्रेरणादायी आहे.

### तळटीपा -

1) डॉ. महीप सिंह, शिख विचार धारा, गुरू नानक से गुरु ग्रंथ साहब तक, सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार पृ.- 93
2) Mohmood Cynthia Keppley, Fighting for Faith and Nation with Sikh Militants Page No.- 43
3) Shikh Dharma-Vishwakosh.Marathi.gov.in
4) Shikh Dharma-Vishwakosh.Marathi.gov.in
5) Mohmood Cynthia Keppley, Fighting for Faith and Nation with Sikh Militants Page No.- 44
6) Mohmood Cynthia Keppley, Fighting for Faith and Nation with Sikh Militants Page No.- 43
7) Https://navbharattimes.indiatimes.com

8) बलदेव सिंह बाल, गुरू गोबिंद सिंह सचित्र जीवन, सिरजना प्रैस पृ. - 7

9) बलदेव सिंह बाल, गुरू गोबिंद सिंह सचित्र जीवन, सिरजना प्रैस पृ. - 41

10) बलदेव सिंह बाल, गुरू गोबिंद सिंह सचित्र जीवन, सिरजना प्रैस पृ. - 43

11) बलदेव सिंह बाल, गुरू गोबिंद सिंह सचित्र जीवन, सिरजना प्रैस पृ. - 42

12) बलदेव सिंह बाल, गुरू गोबिंद सिंह सचित्र जीवन, सिरजना प्रैस पृ. - 44

13) सत्येन्द्र पाल सिंह, सिख धर्म दर्शन के मूलतत्व किताबघर प्रकाशन पृ. - 16